# ठाणे महानगरपालिका

## घरगुती व सार्वजनिक गणेशोत्सव २०२० मार्गदर्शक सुचना

कोव्हीड-१९ साथरोगाचा प्रादूर्भाव नियंत्रणाकरिता ठाणे महानगरपालिका क्षेत्रात सन २०२० मध्ये साजरा करण्यात येणा-या गणेशोत्सवासाठी ठाणे महानगरपालिकेद्वारे मार्गदर्शक सूचना तयार करण्यात आलेल्या आहेत. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सदर सूचनांचे पालन व्हावे असे आवाहन ठाणे महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

### घरगुती गणेशोत्सव

१. घरगुती गणेशमूर्तीचे आगमन व विसर्जन मिरवणुकीच्या स्वरूपाचे नसावे, आगमनासाठी व विसर्जनासाठी जास्तीत जास्त ३ व्यक्तींचा समूह असावा. आगमन व विसर्जन प्रसंगी मास्क / शिल्ड इ. स्वयंरक्षणाची साधने काटेकोररीत्या वापरण्यात यावीत.

२. घरगुती गणेशोत्सवासाठी श्रीगणेशाच्या मूर्तीची उंची २ फूटांपर्यंत मर्यादीत असावी. पारंपारिक गणेशमूर्ती ऐवजी घरातील धातू/संगमरवर आदी मूर्तीचे पूजन करावयाचे आहे.

३. गणपतीची सजावट पर्यावरण पूरक वस्तूनी व कमीत कमी सजावटीचे सामान वापरुन करावयाचे आहे. शासन निर्णयानुसार प्लॅस्टिक व थर्माकॉलचा वापर करावयाचा नाही.

४. गणेशोत्सवादरम्यान घरगुती गणपतीच्या दर्शनसाठी गृहभेटी देणे टाळावे व त्या अनुषंगाने तिर्थप्रसादासाठी, महाप्रसादासाठी उपस्थिती टाळावी.

५. विसर्जनाच्या पारंपारीक पद्धतीत विसर्जस्थळी होणारी आरती घरीच करून विसर्जस्थळी कमीत कमी वेळ थांबावे. शक्यती लहान मुले व जेष्ठ नागरिकांनी सुरक्षेच्या दृष्टीने विसर्जनस्थळी जाऊ नये.

६. कृत्रिम तलाव आणि घाट येथे आरती करावयास मनाई आहे.

७. सर्व मोठ्या रहिवाशी संकूलानी मोठे सिंटेक्स टाकी घेवून त्यातच त्यांच्या बिल्डींगमधील गणेशमूर्तीचे विसर्जन करण्याची दक्षता घ्यावयाची आहे. निर्माल्य स्वतंत्रपणे जमा करुन महानगरपालिकेस विल्हेवाटीसाठी द्यावे.

८. नागरिकांनी शाडूची गणेशमूर्ती पूजावी व घरच्या घरी बादलीत विसर्जन करावे अन्यथ घरगुती POP गणपती मूर्ती बाबत विसर्जनासाठी अमोनियम बायकार्बोनेटचा वापर करावा (National Chemical Laboratory Pune येतून मान्यता प्राप्त तंत्रज्ञान) जेणेकरुन मूर्ती ४८ ते ७२ तासाच्या आत विरघळून जाईल.

९. ठाणे महानगरपालिकेने प्रभाग समितीनिहाय मूर्ती स्विकृती केंद्राची व्यवस्था केली आहे. नागरीकांनी गर्दी टाळण्यासाठी गणेश मूर्तीचे दान स्विकृती केंद्रावर करावे.

१०. सर्व कृत्रिम तलावांवर ठाणे महानगरपालिकेने सॅनिटायझर व निर्जंतुकीकरणाची व्यवस्था केली आहे. त्याचा दक्षतेने सर्व नागरिकांनी वापर करावयाचा आहे. कृत्रिम तलावावर व घाटावर सोशल डिस्टन्सिंग मार्कींग, बॅराकेटींग केलेले आहे. त्याचे सर्वांनी पालन करावयाचे आहे.

११. घरगुती गणपती विसर्जनासाठी प्रत्येकाने वैयक्तिक न जाता रहिवासी संकुले, चाळी येथील गणपती हातगाडी, ट्रक, टेम्पो, इ.मध्ये ठेवून सर्वगणपतींचे फक्त २-३ व्यक्तींद्वारे विसर्जन करावे.

१२. ठाणे महानगरपालिका, पोलीस प्रशासन व शासन यांनी घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१३. घर / इमारत गणेशोत्सव कालावधीत प्रतिबंधित क्षेत्र म्हणून जाहीर केल्यास प्रतिबंधित क्षेत्र नियमांचे पालन करण्यात यावे.

### सार्वजनिक गणेशोत्सव

१. सार्वजनिक गणेशोत्सवासाठी मंडळांनी शक्यतोवर यावर्षी सार्वजनिक गणपतीची प्रतिष्ठापणा करण्याचे टाळावे.

२. यावर्षी शक्यतो गणेशोत्सव कमीत कमी दिवस साजरा करावा.

३. श्री गणेशाची मूर्ती सार्वजनिक मंडळाकरीता ४ फुटाच्या मर्यादेत असावी.

४. गणपती मंडळांनी मंडपांमध्ये दिवसातुन ३ वेळा निर्जतुकीकरणाची व्यवस्था करावयाची आहे. तसेच थर्मल स्क्रीनिंग, सॅनिटायझर आणि Pulse Oximeter पर्याप्त व्यवस्था करावयाची आहे. मंडपात एका वेळी ५ पेक्षा जास्त कार्यकर्ते राहु नये. मंडपात वावरणा-या प्रत्येक व्यक्तीला मास्क लावणे / वापरणे बंधनकारक राहील.

५. भक्तांना मंडपात जाऊन गणेशमूर्तीचे दर्शन करता येत नाही, हार फूले ही अर्पण करता येणार नाही. आरतीसाठी केवळ १० कार्यकर्त्यांनाच उपस्थित राहता येईल. तसेच ध्वनी प्रदुषणासंदर्भातील नियमांचे व तरतूदीचे पालन करावयाची आहे.

६. श्रीगणेशाचे दर्शनाची सुविधा ऑनलाईन, केबल नेटवर्क, वेबसाईट व फेसबुक इत्यादीद्वारे उपलब्ध करुन देण्याबाबत जास्तीत जास्त व्यवस्था करावयाची आहे.

७. मिरवणूक / अन्नदान / महाप्रसाद, इत्यादी कार्यक्रमांना होणा-या गर्दीला टाळण्याकरिता पूर्णतः मनाई करण्यात येत आहे.

८. उत्सवाकरिता वर्गणी/देणगी स्वेच्छेने दिल्यास त्यांचा स्वीकार करावा, जाहिरातीच्या प्रदर्शनामुळे गर्दी आकर्षित होणार नाही असे पहावे. तसेच आरोग्य विषयक व सामाजिक संदेश असलेल्या जाहिराती प्रदर्शित करावयाची आहे.

९. सांस्कृतिक कार्यक्रमांऐवजी आरोग्य विषयक उपक्रम/शिबीर उदा. रक्तदान, आयोजित करण्यास प्राधान्य देण्यात यावे आणि त्याद्वारे कोरोना, मलेरिया, डेंग्यू इ. आजार आणि त्यांचे प्रतिबंधात्मक उपाय तसेच स्वच्छता यांबाबत जनजागृती करावयाची आहे.

१०. गणपती उत्सव आयोजकांनी, कार्यकर्ते यांच्यामुळे निर्माण झालेले ग्लोव्हज , मास्क, कॅप इत्यादी कच-यांचे वर्गीकरण करुन वेगळे ठेवण्याची दक्षता घ्यावयाची आहे. त्यासाठी डस्ट बिन दोन (ओला/सुका) प्रकारचे ठेवायचे आहे.

११. मंडपाच्या लगत फुले, हार, प्रसाद यांचे विक्रींचे स्टॉल लावता येणार नाहीत.

१२. गणपती मंडपामध्ये किंवा परिसरात सेल्फी ला बंदी करणे.

१३. श्रीगणेशाची मूर्तीची उंची ४ फुटापेक्षा अधिक नसल्याने १२ फुट उंची पेक्षा जास्त मंडपाची उंची ठेवू नये. शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ठाणे महानगरपालिकेने ४ फुटाच्या उंचीपर्यंतची गणपती मुर्ती विसर्जनाची सुविधा केली आहे याची मंडळांनी दक्षतेने नोंद घ्यावी.

१४. सार्वजनिक गणेशोत्सवासाठी गणेशोत्सव मंडळांनी महापालिका/स्थानिक प्रशासन यांची त्यांचे धोरणानुसार यथोचित पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. सर्व गणेशोत्सव मंडळांनी मंडप उभारणीकरिता ऑनलाईन अर्ज दाखल करावयाचा आहे. त्याबाबतची जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे. परवानगीशिवाय मंडप ऊभारणी करु नये. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळानी हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१५. गणेशोत्सव कालावधीत गणपती मंडळाला भेट दिलेल्या ठिकाणी व्यक्तींची नोंद करण्यासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवणे बंधनकारक आहे. जेणेकरुन यदा कदाचित संशयीत रुग्ण आढळल्यास Contact Tracing करणे सोयीचे होईल.

१६. विसर्जनाच्या तारखेस जर घरगुती तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा परिसर प्रतिबंधित क्षेत्रात असेल तर मुर्तीविसर्जन सार्वजनिक ठिकाणी करण्यास मनाई करण्यात आली आहे. प्रतिबंधित क्षेत्रातील गणेशभक्तांनी आपल्या घरातील गणपतीचे घरीच विसर्जन करावे. तसेच सार्वजनिक मंडळानी मंडपातच लोखंडी टाकी ठेवून किंवा तत्सम व्यवस्था करून मूर्तीचे विसर्जन करणे बंधनकारक असणार आहे.

१७. विसर्जनाच्या तारखेस घरगुती गणपती असलेली इमारत प्रतिबंधित क्षेत्रात असेल तर त्यांना विसर्जनासाठी घरगुती गणेशमूर्ती बाहेर घेऊन जाण्यास परवानगी नसेल. मूर्तीचे विसर्जन बादलीमध्ये, ड्रममध्ये करणे बंधनकारक राहील. आगमन व विसर्जनच्यावेळी तीनपेक्षा अधिक लोक जमणार नाहीत याची काळजी घ्यावी लागणार आहे.

१८. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचेकडून प्राप्त झालेल्या सर्व नियमाचे पालन करणे आवश्यक आहे. उत्सव प्रसंगी अशी कोणतीही कृती करू नये, जेणेकरुण कोरोना विषाणूचा फैलाव होईल अन्यथा अशा व्यक्ती साथरोग कायदा १८९७, आपत्ती निवारण कायदा २००५ व भा. दं. वि. १८६० कायद्यान्वये कारवाईस पात्र राहतील.

खालीलप्रमाणे घाट, कृत्रीम तलाव, गणेशमूर्ती स्विकृती केंद्रांची व्यवस्था आहे.

- **कृत्रिम तलाव – संख्या १३**

  मासुंदा तलाव, खारेगाव तलाव, रेवाळे तलाव, पायलादेवी मंदिर उपवन तलाव, निलकंठ हाईट उपवन तलाव, रायलादेवी तलाव नं. १, रायलादेवी तलाव नं. २, घोसाळे तलाव, खिडकाळी तलाव, कोलशेत विभाग, ब्रम्हांड विभाग, दातीवली तलाव, न्यू शिवाजी नगर कळवा तलाव.

- **घाट – संख्या ७**

  कोपरी, कळवा पुल (ठाणे बाजू) (चेंदणी कोळीवाडा), कळवा पुल कळवा बाजू (निसर्ग उद्यान), बाळकुम घाट, पारसिक रेतीबंदर, कोलशेत, दिवा घाट.

- **मुर्ती स्विकृती केंद्र ठिकाणे – संख्या २०**

  मासुंदा तलाव परिसर, मढवी हाऊस / राम मारुती रोड, जेल तलाव, चिरंजीवी हॉस्पिटल, मॉडेला चेकनाका, देवदयानगर, कोपरी प्रभाग कार्यालय, पवारनगर जंक्शन / वसंत विहार शाळा, खेवरा सर्कल / घाणेकर ऑडिटोरीयम, किसननगर बसस्टॉप, शिवाजीनगर, यशोधन नगर चौक / लोकमान्यानगर बसस्टॉप - रोड नं. २२, ट्रॉपिकल लगुन समोर आनंदनगर, लोढा लक्झेरिया, मनिषा नगर, भारत गिअर्स, शिळ प्रभाग कार्यालय, जिव्हाळा हॉल - दिवा

**(विपिन शर्मा)**
**महापालिका आयुक्त,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**